# कपडे आध्यात्मिकदृष्ट्या कसे असावेत ?

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


- मनोगत ५
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ७
- 'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ १०
- ज्ञान-प्राप्तकर्त्या साधकांचा परिचय १२
- ग्रंथाच्या मुखपृष्ठावर झालेला आसुरी शक्तींचे आक्रमण ! १३

१. कपडे परिधान करण्याचे महत्त्व आणि लाभ १५
२. कपड्याची सात्त्विकता अवलंबून असणारे घटक अन् महत्त्व २०
३. कपड्याचे प्रकार २०
    * कृत्रिम धाग्यांच्या कपड्यांपेक्षा नैसर्गिक धाग्यांचे कपडे का वापरावेत ? २१
४. कपड्यांचा रंग ३८
    * कपड्यांचा रंग निवडण्यामागील सर्वसाधारण आध्यात्मिक दृष्टीकोन ४२
    * हिंदु धर्मात काळा रंग त्याज्य मानलेला असणे ४६
५. कपड्यांवरील वेलवीण (नक्षी) ५१
    * कपड्यांवरील वेलवीण सात्त्विकतेच्या दृष्टीने कशी असावी ? ५२
६. कपडे शिवण्याची पद्धत ५५
    * पूर्वीच्या काळची गाठ मारलेले कपडे घालण्याची योग्य पद्धत ५५
    * कपड्यांवर न्यूनतम (कमीतकमी) शिलाई का असावी ? ५५
७. कपडे वापरण्याच्या संदर्भात काही व्यावहारिक सूचना ५९
    * विटलेले, फाटलेले किंवा उसवलेले कपडे का वापरू नयेत ? ६१
    * इतरांनी वापरलेले कपडे का वापरू नयेत ? ६१
    * उन्नतांनी वापरलेले कपडे वापरणे लाभदायक का ठरते ? ६२

८. भाव असलेले, चांगली पातळी असलेले, संत आणि गुरुकृपायोगानुसार साधना करणारे यांनी बाह्य वेशभूषेला महत्त्व देण्याची आवश्यकता नसणे ६८

# मनोगत

‘विकृतवासो न आच्छादनीयम् ।’, असे म्हणतात. याचा अर्थ आहे, मनुष्याने विकृत वेश करू नये. मनुष्याचा वेश अधिकतर त्याने घातलेल्या कपड्यांवरूनच ठरत असतो. आजकालची तरुण पिढी ‘फॅशन’च्या नावाखाली चित्रविचित्र आकृत्या असलेले, चटेरीपटेरी रंगांचे, जीन्स-स्ट्रेचेबल्स यांसारखे तोकडे आणि घट्ट बसणारे अशा नाना प्रकाराचे कपडे वापरते. ही सर्व विकृत वेशभूषा आहे. विकृत वेशभूषा म्हणजे रज-तमात्मक स्पंदने निर्माण करणारी वेशभूषा. अशा वेशभूषेमुळे मनुष्याची बुद्धी विकृत बनते, तो नाना दुष्प्रवृत्तींचा गुलाम बनतो, काम-क्रोधादी षड्‌रिपूंच्या अधीन होतो आणि वाईट शक्तींच्या आक्रमणांना (हल्ल्यांना) बळी पडतो. याउलट मनुष्याने सात्त्विक कपडे घातल्याने त्याला ईश्वरी चैतन्य ग्रहण करता आल्यामुळे त्याचे मन आणि बुद्धी सात्त्विक होतात. तो सदाचरणी आणि विवेकी बनतो, तसेच त्याचे वाईट शक्तींच्या आक्रमणांपासून रक्षण होण्यासही साहाय्य होते.

प्रत्येक वस्तूला गुणभूत स्पंदने असतात. कपड्याचा प्रकार, आकार, रंग, वेलवीण (नक्षी), कपड्याची शिलाई इत्यादी घटकांवर कपड्यातील स्पंदने अवलंबून असतात. हे घटक जितके सात्त्विक असतील, तितके कपडे सात्त्विक बनतात. हे घटक सात्त्विक असण्याच्या दृष्टीकोनातून कसे असावेत, हे या ग्रंथात दिले आहे. नायलॉन, टेरिलिन यांसारख्या कृत्रिम धाग्यांपासून बनवलेल्या कपड्यांपेक्षा सुती, कौशेय (रेशमी) यांसारख्या नैसर्गिक धाग्यांपासून बनवलेले कपडे का वापरावेत, सात्त्विक रंग कोणते, वेलवीण नसलेले कपडे अधिक योग्य का असतात, कपड्यांची शुद्धी का आवश्यक आहे यांसारख्या अनेक प्रश्नांच्या उत्तरांवरून कपड्यांमागील अध्यात्मशास्त्रीय दृष्टीकोन स्पष्ट व्हायला साहाय्य होईल. सात्त्विक कपडे निवडतांना आपल्या आवडी-निवडीपेक्षा स्पंदनशास्त्राचा अभ्यास उपयुक्त ठरतो. तो कसा करावा, याची तोंडओळख ग्रंथात दिलेल्या काही सूक्ष्मातील प्रयोगांवरून होईल.

सर्वसाधारण मनुष्याने चैतन्यग्रहणाच्या उद्देशाने सात्त्विक कपडेच घालावेत. एखाद्यात भाव असेल, तर त्याची वृत्ती सात्त्विक असते आणि त्याच्याकडून होणाऱ्या भावप्रधान कृतींमुळे त्याला ईश्वरी चैतन्य सहजपण  ग्रहण करता येते. तसेच ६० टक्क्यांपेक्षा जास्त पातळी असलेल्या आणि देहबुद्धीचा विसर पडलेल्या साधकांचा प्रवास ईश्वरप्राप्तीच्या दिशेने शीघ्रगतीने होत असतो. अशा साधकांच्या दृष्टीने ‘कोणत्या प्रकारचे कपडे घालावेत’, याला फारसे महत्त्वच उरत नाही. असे असले तरी, त्यांनी सात्त्विक कपडे घातल्यावर त्यांची स्वतःची सात्त्विकता वाढतेच, तसेच त्या सात्त्विकतेचा

समष्टीलाही मोठा लाभ होतो. सात्त्विक कपड्यांमुळे मुलांवर संस्कार होण्यासही साहाय्य होते. यासाठी त्यांनी सात्त्विक कपडे घालणे केव्हाही श्रेयस्करच आहे.

सात्त्विक कपड्यांमागील दृष्टीकोन लक्षात घेऊन तो आचरणात आणण्याची प्रेरणा अधिकाधिक जणांना होऊन त्यांच्यातील सात्त्विकता वर्धमान होवो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना.

**- संकलक.**